# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई-१

फोन नं . : (022) - 24016239
फोन नं.: (022) - 24015269
ई मेल :sromumbai1@mpcb.gov.in
वेबसाईटü : htpp//mpcb.gov.in

कल्पतरु पाईंट, १ ला मजला,
शीव माटुंगा स्कीम रोड नं. ८,
शीव सर्कल जवळ, शीव (पूर्व),
मुंबई – २२.

**जा. क्र मांक: मप्रनि/ उप्राकामु-१/- २e१** दिनांक :- 0६/02/2020

प्रति,
सह संचालक (जल प्रदुषण नियंत्रण),
म.प्र.नि. मंडळ, सायन,
मुंबई - ४०००२२.

**विषयः- मे. शीतलदास इस्टेट प्रा. लि., सी.एस.नं. 311 ऑफ कंबालहिल डिव्हीजन, वाळकेश्वर रोड, मुंबई** येथील प्रस्तावित इमारत पुर्नबांधणी प्रकल्पाची पर्यावरण विषयक जनसुनावणीचे इतिवृत....

**संदर्भ :-** कार्यालयीन आदेश क्र. ई -९६ , दि. ३०/१२/२०१९.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून **मे. शीतलदास इस्टेट प्रा. लि., सी.एस.नं. 311 ऑफ कंबालहिल डिव्हीजन, वाळकेश्वर रोड, मुंबई** इमारत पुर्नबांधणी प्रकल्प प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक अनुज्ञतीसाठी जाहिर सुनावणी दि. **१३/०१/२०२०** रोजी दुपारी **१२.००** वाजता **जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई शहर), ओल्ड कस्टम हाउस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१** येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर सुनावणी दरम्यान इमारतीच्या रहिवाशी तसेच भाडेकरू यांनी केलेल्या सुचना, टिकाटिप्पणी, विचार व आक्षेप इत्यादी समाविष्ट करून जन सुनावणीचं इतिवृत्तांत आपल्या माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात येत आहे. इतिवृत्ता सोबत खाली नमुद केलेली दस्ताऐवज जोडण्यात येत आहे.

१. जन सुनावणीचे मा. अध्यक्ष, सदस्य व आयोजक यांचे स्वाक्षरीतील इतीवृत्त
२. जन सुनावणी बाबत आदेशाची प्रत
३. दैनिक फ्री प्रेस जरनल या इंग्रजी दैनिकात व नवशक्ती या मराठी दैनिकात प्रसिध्द झालेल्या सुनावणीबाबतच्या नोटीसच्या छायांकि त प्रत.
४. जन सुनावणीच्या फोटो.
५. सुनावणीस उपस्थित लोकांचा हजेरी पट.

आपला विश्वासू,

(तानाजी यादव)
उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई -१

**प्रत सादर:-**

**१.जिल्हाधिकारी कार्यालय, ओल्ड कस्टम हाउस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई 400 001**
**२.प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई**
**३. मे. शीतलदास इस्टेट प्रा. लि., सी.एस.नं. 311 ऑफ कंबालहिल डिव्हीजन, वाळकेश्वर रोड, मुंबई**

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

उप-प्रादेशिक कार्यालय, मुंबई-१

फोन नं . : (०२२) - २५५०५१२८
फॅक्स नं.: (०२२) - २५५०५१२६
ई मेल :romumbai@mpcb.gov.in
वेबसाईटü : htpp//mpcb.gov.in

कल्पतरु पाईंट, १ ला मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कल जवळ, शीव (पूर्व), मुंबई- ०२२.


जा. क्र मांक: मप्रनि/ उपप्राकामु १/९८५

दिनांक: २८ /०१ /२०२१

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष,
लोकसुनावणी समिती,
ओल्ड कस्टम हाउस, शहिद भगतसिंग मार्ग,
फोर्ट, मुंबई-००१

विषय : मे. शीतलदास इस्टेट प्रा. लि., सी.एस.नं. ३११ ऑफ कंबालहिल डिव्हीजन, वाळकेश्वर रोड, मुंबई या प्रकल्पाचे प्रस्तावित पुनर्बांधकामाबाबतची पर्यावरणविषयक जनसुनावणीचे मसुदा इतिवृत्त.

संदर्भ : दि. १३/०१/२०२० रोजी पर्यावरणविषयक जनसुनावणी.

महोदय,

मे. शीतलदास इस्टेट प्रा. लि., सी.एस.नं. ३११ ऑफ कंबालहिल डिव्हीजन, वाळकेश्वर रोड, मुंबई या प्रकल्पाचे प्रस्तावित पुनर्बांधकामाबाबतची पर्यावरणविषयक जनसुनावणीचे मसुदा इतिवृत्त (मराठी व इंग्रजी) आपल्या मान्यतेसाठी सादर करीत आहे.

सविनय सादर.

आपला विश्वासू,

( तानाजी यादव )
उप प्रादेशिक अधिकारी
तथा
संयोजक
लोकसुनावणी समिती

# <u>जनसुनावणीचे इतिवृत्त</u>

**मे. शीतलदास इस्टेट प्रा. लि., सी.एस.नं. ३११ ऑफ कंबालहिल डिव्हीजन वाळकेश्वर रोड, मुंबई** येथे प्रस्तावित पुनर्बांधकामाबाबतची पर्यावरणविषयक जनसुनावणी दिनांक **१३.०१.२०२०** रोजी दुपारी १२.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई (शहर), ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१ याठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीसाठी खालील शासकीय अधिकारी उपस्थित होते.

१) श्री. शिवाजी जोंधळे - अध्यक्ष
जिल्हाधिकारी, तथा जिल्हादंडाधिकारी,
मुंबई शहर

२) श्री. प्रविण जोशी - सदस्य्
प्रादेशिक अधिकारी, मुंबई
म.प्र.नि. मंडळ, मुंबई.

3) श्री. तानाजी यादव - संयोजक
उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई -१
म.प्र.नि. मंडळ, मुंबई.

जनसुनावणीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे -

सर्वप्रथम श्री. तानाजी यादव, जनसुनावणीचे आयोजक यांनी सर्वांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीस सुरुवात केली. त्यांनी आजची जनसुनावणी ही भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, दिल्ली यांच्या अधिनियम २००६ व सुधारीत २००९ तसेच जनसुनावणी सागरी तटीय विनियमन अधिनियम २०११ चे कलम क्र. 8 (V) (C) (d)- 4 शुध्दीपत्रक ६ जानेवारी २०११ मधील तरतुदी नुसार घेण्यात येत आहे असे सांगितले. सदर प्रकल्प धारकाने म.प्र.नि. मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठीचा दि. १३/०८/२०१९ रोजी प्रस्ताव सादर केला. तद्नंतर मा. जिल्हाधिकारी यांनी सोमवार, दिनांक १३.०१.२०२० रोजी पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याची तारीख निश्चित केली. सदर जाहीर जनसुनावणीची जाहिरात एक महिना अगोदर दैनिक नवशक्ती या वर्तमानपत्रात मराठी भाषेमध्ये तसेच दैनिक फ्री प्रेस जर्नल या वर्तमानपत्रात इंग्रजी भाषेमध्ये दिनांक ११.१२.२०१९ रोजी प्रसिध्दी करण्यात आली. त्याअनुषंगाने आजची पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावीत प्रकल्पाच्या प्रवर्तकांनी तयार केलेल्या पर्यावरण विषयक अहवालाच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाउस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-००१ मा. प्रधान सचिव ,पर्यावरण विभाग मंत्रालय, नवीन प्रशासकिय इमारत, मुंबई. प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय), मप्रनि मंडळ, सायन, मुंबई. सहाय्यक आयुक्त, डी वॉर्ड, महानगरपालिका कार्यालय इमारत नाना चौक, ग्रँट रोड (प) मुंबई-४००००७, प्रादेशिक अधिकारी/उपप्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई. इ. ठिकाणी रहिवासी यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. या जनसुनावणीचा उद्देश रहिवासी यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होईल व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांची माहिती देणे हा आहे असे सांगितले. श्री. तानाजी यादव, यांनी सांगितले की, प्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी प्रकल्पाविषयीची माहिती सादर करतील व त्यानंतर रहिवासी यांनी त्यांचे सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत आक्षेप, तक्रारी, सुचना मांडाव्यात व त्याची नोंद इतिवृत्तात घेउन ते पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल. तसेच या समितीचे काम जनसुनावणी घेणे, रहिवासी टिका, टिप्पणी यांची नोंद घेवून त्याचा अहवाल शासनाला सादर करणे हे आहे असे सांगितले व प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषी माहिती देण्याची सूचना केली.

यानंतर श्री. चिपळूनकर , प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी सदर प्रकल्पाबाबत विस्तृतपणे स्लाईड शो द्वारे सादरीकरण केले, सदर सादरीकरणामध्ये त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती, ठिकाण इ. बाबतची माहिती दाखविली. त्यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबतच्या इमारतीचा नकाशा, वाहन स्थळ तसेच रहिवाशी क्षेत्र इत्यादींची माहिती सादर केली. तसेच सी.एस. नं. ३११ वरील सदर इमारती या वाळकेश्वर रोडवर असून त्या CZMP नुसार १९/१२/१९९१ पूर्वीच्या असल्याचे सांगण्यात आले. सदर प्रकल्पाचे सध्याचे क्षेत्रफळ ४३९०.९६ चौ.मी. इतके असून ते सागर तटीय निर्बंधन क्षेत्र २ मध्ये येते. सदर प्रकल्पाच्या ठिकाणी सेस इमारत "कॅटेगरी – ऐ आर" असून सदर प्रस्तावित बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ हे १७६३८.५३ चौ.मी. इतके असेल सदर प्रकल्पामध्ये एक इमारतीच्या दोन विंग, पहिली विंग- तळमजला + १ ते २९ वरील मजले हे रहिवाशी मजले व दुसऱ्या विंगमध्ये ३ तळघर + तळमजला + १ ते ५ थराचे वाहनतळ असेल. प्रकल्प पुर्ण होउन रहिवासी राहण्यास आल्यानंतर पाण्याचा वापर हा ७५.०० घ.मी. प्रती दिन इतका असेल. तर त्यातून निर्माण होणारे सांडपाणी हे ६४.०० घ.मी. प्रती दिन इतके असेल. सदर प्रकल्पातून निघणारे घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ७५ इतक्या क्षमतेचा सांडपाी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येईल व या सयंत्रणेमधील प्रक्रियाकृत सांडपाणी बांधकाम व फल्शिंगसाठी वापरण्यात येईल व उर्वरीत प्रक्रियाकृत सांडपाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनिसारण वाहिनीत विल्हेवाट केले जाईल. सदर प्रकल्पामधून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे वर्गीकरण सुका व ओला असे करण्यात येईल व ओल्या कचऱ्याचे (OWC) खत बनविण्यात येईल व ते बाग बगिच्यासाठी वापरण्यात येईल. तर सुका कचरा हा पुनर्वापरासाठी पाठविण्यात येईल अथवा विकला जाईल. सदर प्रकल्प उभारत असताना आवाजाची तिव्रता कमी करण्याच्या दृष्टीने तसेच धुळीमुळे आजुबाजुच्या परिसरातील लोकांना त्रास होऊ नये यासाठी योग्य ती उपाययोजना करण्यात येईल. तसेच अग्नीशमन यंत्रणा, उर्जेचा वापर व बचत विषयी माहिती दिली. सादरीकरणाच्या शेवटी तांत्रिक सल्लागाराने प्रकल्पाधारकाकडून राबविण्यात येणार असलेल्या पर्यावरण विषयक उपाययोजनांची माहिती देवून सादरीकरण समाप्त केले.

तदनंतर मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी उपस्थित रहिवासी यांना प्रकल्प प्रवर्तकाने पर्यावरण विषयक केलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने काही शंका, टिका टिप्पणी अथवा उपाययोजना बद्दलची माहिती द्यावयाची असल्यास आपण ती या ठिकाणी तोंडी अथवा लेखी स्वरूपात सादर करणे बाबत सुचविले तसेच सदरची माहिती ही फक्त पर्यावरण विषयासंबंधीत असणे आवश्यक आहे. सदर प्रश्नांच्या अनुषंगाने प्रकल्प प्रवर्तक त्यावर करण्यात ये णाऱ्या उपाययोजनांच्या अनुषंगाने थोडक्यात माहिती देतील असे नमूद केले.

<u>प्रश्नोत्तरे</u>

**श्री. शिवाजी जोंधळे, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर**
**प्रश्न** :- सदर प्रकल्पामध्ये एकुण किती टेनन्ट्स आहेत?
**उत्तर**:- . सदर प्रकल्पामध्ये एकुण १०८ टेनन्ट्स आहेत

**श्री. शिवाजी जोंधळे, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर**
**प्रश्न** :- सध्या साईटवर किती इमारती अस्तित्वात आहे?
**उत्तर**:- . सध्या साईटवर एकुण ६ (६०, ६४ अ, ६४बी - ६४ सी, ६४ डी, ६४ डी - ६४ ई, ६४ ई) इमारती आहेत.

**श्री. शिवाजी जोंधळे, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर**
**प्रश्न** :- सदर प्रस्तावित जागा कोणाच्या मालकीची आहे ?
**उत्तर**:- सदर जागा ही मे. शितलदास इस्टेट यांच्या मालकीची असल्याचे सांगण्यात आले.

**श्री. प्रविण जोशी, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई**
**प्रश्न्** :- एकुण प्रकल्पामध्ये मोकळी जागा व लावण्यात येणा-या वृक्षाविषयी माहिती देण्यास सांगितले ?

**उत्त्र** :- श्री. चिपळूनकर, सल्लागार यांनी एकुण ५०० चौ.मी. इतकी जागा वृक्षलागवडीसाठी उपलब्ध असल्याचे सांगितले.

**श्री. प्रविण जोशी, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई**

**प्रश्न्** :- प्रकल्पधारकांनी मोडकळीस आलेली इमारत पाडण्यापुर्वी मुंबई महानगरपालिकेची ना हरकत प्रमाणपत्र घेतले का व डेब्रीजची विल्हेवाट कुठे लावण्यात आली याविषयी माहिती देण्यास सांगितले ?

**उत्त्र** :- श्री. चिपळूनकर, सल्लागार यांनी, यासाठी महानगरपालिकेची ना हरकत प्रमाणपत्र घेतली असून डेब्रीजची विल्हेवाट महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी करण्यात येईल असे सांगितले.

**श्री. प्रविण जोशी, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई**

**प्रश्न्** :- सदर प्रकल्पामध्ये OWC अथवा कंपोस्टींग पीठ प्रस्तावित आहेत का ?

**उत्त्र** :- श्री. चिपळूनकर, सल्लागार यांनी सदर प्रकल्पामध्ये OWC प्रस्तावित असल्याचे सांगितले.

**श्री. तानाजी यादव, उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई- १**

**प्रश्न** :- या नियोजित प्रकल्पासाठी पावसाळी पाणी साठवणुक कशी केली जाणार आहे ?

**उत्तर**:- श्री. चिपळूनकर, सल्लागार यांनी सदर प्रकल्पामध्ये ३० मीटर क्युब क्षमतेची टाकी बेसमेंन्टला प्रस्तावित केली आहे अशी सांगितले आहे.

**श्री. मुकेश दलाल, प्रकल्पधारक,**

**प्रश्न** :- विकासकांनी आम्हाला प्रकल्पाविषयी अपूर्ण माहिती सांगितली?

**उत्तर**:- श्री. चिपळूनकर, सल्लागार यांनी सदर प्रकल्धारकाला सादरीकरणा दरम्यान प्रकल्पविषयी पुर्ण माहिती सांगून त्यांना सदर प्रकल्पाच्या पर्यावरणीय अहवालाच्या साराशांची प्रत देण्यात आली तथापी या प्रकल्पा विषयी त्यांचा विरोध नसल्याचे त्यांनी सांगितले.

शेवटी जन सुनावणी समितीचे अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी यांनी उपस्थितांनी जे म्हणणे आज मांडलेले आहे त्याची नोंद घेण्यात आलेली आहे, आजच्या जनसुनावणीचे इतिवृत्त, सी.डी. व आपण विचारलेल्या प्रश्न याचा समावेश करून पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल असे सांगितले.

तदनंतर सदर प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीसाठी सर्वांनी उपस्थित राहून आपली मते मांडून जनसुनावणी शांततेने पार पाडल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानले तसेच प्रकल्पातील रहिवाशी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांचे या प्रकल्पाविषयी पर्यावरण विषयी प्रश्न नसतील असे सांगितले व त्यांनी जनसुनावणी यशस्वी संपन्न् झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| तानाजी यादव<br>उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, मुंबई, संयोजक/सदस्य<br>जनसुनावणी समिती | प्रविण जोशी<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई<br>सदस्य्<br>जनसुनावणी समिती | शिवाजी जोंधळे<br>जिल्हाधिकारी तथा<br>जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर<br>अध्यक्ष<br>जनसुनावणी समिती |